# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 11/11/2016 (दिनांक 26.10.2016 का.प.क्र.07 रोजीची तहकूब सभा) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 11 नोव्हेंबर 2016 (का.प.क्र .07) रोजी मा.सभापती श्री.मोहन मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.00 वाजता सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.अय्युब खान, उपआयुक्त (म), नगरसचिव श्रीमती अपर्णा थेटे व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 2. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 3. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 4. | स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| 5. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 6. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 7. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 8. | स.स.श्री.शेख समीना शेख इलियास |
| 9. | स.स.श्री.अजीम अहेमद रफिक |
| 10. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 11. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 12. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |
| 13. | स.स.श्री.सोहेल शकील शेख |

**विषय क्र. 50 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.79, न्यायनगर येथील परीमल सो. ते गुरूसहानी नगर अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 3499488/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2016-2017 च्या आर्थिक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षामधुन करण्यात येणार आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी मिळाली असून मा.स्थायी समिती सभागृहासमोर पाठविणे बाबत आदेशीत केले आहे.

तरी रक्कम रू.3499488/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती :विषय क्र.50 ते 59 मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.79, न्यायनगर येथील परीमल सो. ते गुरूसहानी नगर अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 3499488/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 51 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्रमांक 53 औरंगपुरा अंतर्गत दलालवाडी, कामगार कॉलनी तसेच इतर ठिकाणी कॉंक्रीटकरण करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 34,95,237/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कम रू.35.00 लक्ष च्या तरतुद मधुन करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 34,95,237/- मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रमांक 53 औरंगपुरा अंतर्गत दलालवाडी, कामगार कॉलनी तसेच इतर ठिकाणी कॉंक्रीटकरण करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 34,95,237/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 52 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्रमांक 48 गुलमंडी परिसरातील विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,99,918/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कम रू.30.00 लक्ष च्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,99,918/- मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रमांक 48 गुलमंडी परिसरातील विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 29,99,918/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 53 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रमांक 55 जुना मोंढा येथे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 31,96,825/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कम रू.50.00 लक्ष च्या तरतुद मधून करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 31,96,825/- मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक 55 जुना मोंढा येथे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये 31,96,825/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 54 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक 30/06/2016 रोजी मा.सर्वसाधारण सभेने समांतर जलवाहीनी पीपीपी प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. नंतर दिनांक 01/10/2016 रोजी करारनामा

रद्द करण्यात आलेला आहे. अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेचे संचलन, देखभाल दुरूस्ती व औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजना राबविण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे. या अंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्र ते नक्षत्रवाडी पंपगृह दरम्यान 700 मीमी व 1219 मीमी व्यासांच्या शुध्द उध्दरण वाहिन्यांची व अनुषंगीक उपांगांची वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याची कामे हाती घ्यावी लागणार आहे.

औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र ते नक्षत्रवाडी पंपगृह दरम्यान असलेल्या मुख्य जलवाहिन्या, विविध उपांगे यांची वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रका अंतर्गत असलेल्या 700 मीमी व 1219 मीमी व्यासांच्या उध्दरण वाहिन्यांची व अनुषंगीक उपांगांची वार्षिक देखभाल दुरूस्ती, जलवाहिन्यांवर असलेल्या विविध झडपांची दुरूस्ती, विविध चेंबर्सची दुरूस्ती, इत्यादी कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक रक्कम रूपये 45,54,400/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद सन 2015-2016, सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार व ज्या बाबींचा समावेश दरसुचीमध्ये नाही, अशा बाबींकरीता खुल्या बाजारातून दरपत्रके घेऊन मान्यता घेतलेल्या दरांनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील अंदाजपत्रकात आवश्यक असलेल्या देखभाल दुरूस्तीच्या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. विषयांकित कामांतर्गत महानगरपालिकेने यापूर्वी केलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरूस्तीच्या कामांचा पुर्वानुभव पाहता सदर कामे आकस्मिकरित्या उद्‌भवल्यानंतर युध्द पातळीवर दुरूस्ती करावी लागते. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या बाबी अंतर्गत कुठल्याही बाबीमध्ये नमूद परिमाणात कितीही पटीने वाढ होऊ शकते किंवा काही बाबींची कामे करण्याची आवश्यकता न भासल्यास त्या बाबी अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदींचा वापर इतर बाबींच्या वाढीव परिमाणाकरीता करावा लागणार आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे रक्कम रूपये 45,54,400/- च्या वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेच्या अंदाजपत्रकास मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्र ते नक्षत्रवाडी पंपगृह दरम्यान 700 मीमी व 1219 मीमी व्यासांच्या शुध्द उध्दरण वाहिन्यांची व अनुषंगीक उपांगांची वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू. 45,54,400/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 55 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक 30/06/2016 रोजी मा.सर्वसाधारण सभेने समांतर जलवाहीनी पीपीपी प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. नंतर दिनांक 01/10/2016 रोजी करारनामा रद्द करण्यात आलेला आहे. अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेचे संचलन, देखभाल दुरूस्ती व औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजना राबविण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे. या अंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना नक्षत्रवाडी पंपगृह ते शहरापर्यंत असलेल्या 1400 मीमी व 1200 मीमी व्यासांच्या गुरूत्व वाहिन्यांची तसेच शहरा अंतर्गत 500 मीमी व्यासापर्यंत असलेल्या मुख्य फिडरमेन्सची व अनुषंगीक उपांगांची वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याची कामे हाती घ्यावी लागणार आहे.

औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत नक्षत्रवाडी पंपगृह ते शहरापर्यंत असलेल्या मुख्य जलवाहीन्या, विविध उपांगे यांची वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रका अंतर्गत नक्षत्रवाडी पंपगृह ते शहरापर्यंत असलेल्या 1400 मीमी व 1200 मीमी व्यासांच्या गुरूत्व वाहिन्यांची तसेच शहरा अंतर्गत 500 मीमी व्यासापर्यंत असलेल्या मुख्य फिडरमेन्सची व अनुषंगीक उपांगांची वार्षिक देखभाल

दुरूस्ती, जलवाहिन्यांवर असलेल्या विविध झडपांची दुरूस्ती, विविध चेंबर्सची दुरूस्ती, इत्यादी कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक रक्कम रूपये 44,44,100/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद सन 2015-2016, सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार व ज्या बाबींचा समावेश दरसुचीमध्ये नाही, अशा बाबींकरीता खुल्या बाजारातून दरपत्रके घेऊन मान्यता घेतलेल्या दरांनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील अंदाजपत्रकात आवश्यक असलेल्या देखभाल दुरूस्तीच्या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. विषयांकित कामांतर्गत महानगरपालिकेने यापूर्वी केलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरूस्तीच्या कामांचा पुर्वानुभव पाहता सदर कामे आकस्मिकरित्या उद्‌भवल्यानंतर युध्द पातळीवर दुरूस्ती करावी लागते. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या बाबी अंतर्गत कुठल्याही बाबीमध्ये नमूद परिमाणात कितीही पटीने वाढ होऊ शकते किंवा काही बाबींची कामे करण्याची आवश्यकता न भासल्यास त्या बाबी अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदींचा वापर इतर बाबींच्या वाढीव परिमाणाकरीता करावा लागणार आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे रक्कम रूपये 44,44,100/- च्या वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेच्या अंदाजपत्रकास मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत नक्षत्रवाडी पंपगृह ते शहरापर्यंत असलेल्या मुख्य जलवाहीन्या, विविध उपांगे यांची वार्षिक देखभाल दुरूस्ती अंतर्गत नक्षत्रवाडी पंपगृह ते शहरापर्यंत असलेल्या 1400 मीमी व 1200 मीमी व्यासांच्या गुरूत्व वाहिन्यांची तसेच शहरा अंतर्गत 500 मीमी व्यासापर्यंत असलेल्या मुख्य फिडरमेन्सची व अनुषंगीक उपांगांची वार्षिक देखभाल दुरूस्ती, जलवाहिन्यांवर असलेल्या विविध झडपांची दुरूस्ती, विविध चेंबर्सची दुरूस्ती, इत्यादी कामांसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 44,44,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 56 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.17 अंतर्गत बिल्डर्स हाऊसिंग सोसायटी येथील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,95,618/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.29,95,618/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.17 अंतर्गत बिल्डर्स हाऊसिंग सोसायटी येथील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,95,618/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 57 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.32 आंबेडकरनगर येथील ग्रिव्हज कंपनी ते पिसादेवी रोड पर्यंतचा रस्ता वर्दळीचा आहे. सदरील रस्ता खराब झाला असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे आवश्यक आहे. या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.32,44,285/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2016-17

मधील शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 28/07/2016 रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तरी वार्ड क्र.32 आंबेडकरनगर येथील ग्रिव्हज कंपनी ते पिसादेवी रोड पर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे र.रू.32,44,285/- चे अंदाजपत्रक प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.32 आंबेडकरनगर येथील ग्रिव्हज कंपनी ते पिसादेवी रोड पर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.32,44,285/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 58 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.64 गुलमोहर कॉलनी अंतर्गत सिडको एन /5 भागातील अरूणोदय कॉलनी व सह्याद्रीनगर येथील रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,99,600/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2016-17 मधील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी वॉर्ड क्र.64 गुलमोहर कॉलनी अंतर्गत सिडको एन / 5 भागातील अरूणोदय कॉलनी व सह्याद्रीनगर येथील रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे र.रू.29,99,600/- चे अंदाजपत्रक प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.64 गुलमोहर कॉलनी अंतर्गत सिडको एन /5 भागातील अरूणोदय कॉलनी व सह्याद्रीनगर येथील रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,99,600/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 59 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, झोन क्र.2 अंतर्गत विविध ठिकाणी पॅचवर्क करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 35,51,752/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-2017 च्या एम ॲन्ड आर पॅचवर्क वार्ड-ड या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कमेमधुन करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 35,51,752/- मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.2 अंतर्गत विविध ठिकाणी पॅचवर्क करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये 35,51,752/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 60 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,.....

विषय : जाफरगेट आठवडी बाजार वसुलीसाठी ठेका देणे बाबत.

संदर्भ : जाहिर निविदा सूचना दि.26/08/2016

| | | |
|---|---|---|
| 01. | खात्याचे नांव | मालमत्ता विभाग |
| 02. | कामाचे स्वरूप | जाफरगेट आठवडी बाजाराची वसूली |
| 03. | पुर्व गणन पत्र मान्य झाले आहे काय? असल्यास मान्यता दिनांक | होय, आधारभुत रक्कम रू.32,700/- दि.28/09/2016 |
| 04. | ज्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती, त्याचे नाव व प्रसिध्दीचा दिनांक | दैनिक लोकमत, दि.26/08/2016 |
| 05. | टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.27/08/2016 ते 02/09/2016 पर्यंत |
| 06. | टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.03/09/2016 |
| 07. | एकुण किती टेंडर आले? | तीन (3) |
| **निविदाधारकांची माहिती** | | |
| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नांव** | **निविदा रक्कम रूपये प्रती बाजार** |
| 01. | श्रीमती चंद्रकला राजु कांबळे | 30,000/- |
| 02. | श्री.राहुल राजु गिरधारे | 26,100/- |
| 03. | श्री.सचिन मोहन दाभाडे | 17,700/- |

| | | |
|---|---|---|
| 01. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| 02. | सदरचे दर प्रचलित बाजार भावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| 03. | जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |

उपरोक्त सदर आठवडी बाजार करीता एकुण 3 निविदा प्राप्त झालेल्या असुन तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.30,000/- प्रती बाजार असून निविदा श्रीमती चंद्रकला राजु कांबळे यांची आहे.

करीता मंजुरीप्रमाणे जाफरगेट आठवडी बाजारासाठी प्राप्त सर्वात जास्त दराची निविदा श्रीमती चंद्रकला राजु कांबळे यांची र.रू.30,000/- प्रती बाजार दराने मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

मा.सभापती :विषय क्र.60.

श्री.राजगौरव वानखेडे :सदर विषय स्थायी समिती सभेसमोर आला होता, याबाबतीत विधी सल्लागार यांनी खुलासा करावा की, मा.न्यायालयात या प्रकरणी काही प्रकरण चालू आहे का? माहीती देण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

विधी सल्लागार :जाफरगेट बाजार बाबत पीआयएल झालेले आहे. पीआरकार्डवर मनपाचे नांव नाही. न्यायालयाचे स्थगीती आदेश नाही. मा.न्यायालयासमोर महानगरपालिकेने वस्तुस्थिती मांडलेली आहे. स्थगीती आदेश दिलेले नाही.

श्री.सिताराम सुरे :कालावधीचा उल्लेख प्रस्तावात केलेला नाही. प्रस्ताव क्रमांक 60 व 61 मध्ये उल्लेख केलेला नाही.

मालमत्ता अधिकारी :एका वर्षासाठीचा हा ठेका आहे.

मा.सभापती : सदरील आठवडी बाजार वसुलीच्या ठेक्याची मुदत ही एक वर्षासाठी राहील, यासह प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जाफरगेट आठवडी बाजार वसुलीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराची निविदा श्रीमती चंद्रकला राजु कांबळे यांची र.रू.30,000/- प्रती बाजार या दराप्रमाणे संबंधीतास आठवडी बाजाराच्या वसुलीचा ठेका एक वर्षासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 61 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,.....

विषय : चिकलठाणा आठवडी बाजार वसुलीसाठी ठेका देणे बाबत.

संदर्भ : जाहिर निविदा सूचना दि.26/08/2016

| | | |
|---|---|---|
| 01. | खात्याचे नांव | मालमत्ता विभाग |
| 02. | कामाचे स्वरूप | चिकलठाणा आठवडी बाजाराची वसूली |
| 03. | पुर्व गणन पत्र मान्य झाले आहे काय? असल्यास मान्यता दिनांक | होय, आधारभुत रक्कम रू.12,715/- दि.28/09/2016 |
| 04. | ज्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती, त्याचे नाव व प्रसिध्दीचा दिनांक | दैनिक लोकमत, दि.26/08/2016 |
| 05. | टेंडर स्विकारण्याची मुदत | दि.27/08/2016 ते 02/09/2016 पर्यंत |
| 06. | टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.03/09/2016 |
| 07. | एकुण किती टेंडर आले? | चार (4) |
| **निविदाधारकांची माहिती** | | |
| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नांव** | **निविदा रक्कम रूपये प्रती बाजार** |
| 01. | श्रीमती सुमित्रा संजय चव्हाण | 16,151/- |
| 02. | श्री.राहुल गिरधारे | 13,500/- |
| 03. | श्री.रमेश दहिहंडे | 13,085/- |
| 04. | श्री.सुभाष जाटवे | 10,500/- |
| | | |
| 01. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| 02. | सदरचे दर प्रचलित बाजार भावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| 03. | जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |

उपरोक्त सदर आठवडी बाजार करीता एकुण 4 निविदा प्राप्त झालेल्या असुन तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.16,151/- प्रती बाजार असून निविदा श्रीमती सुमित्रा संजय चव्हाण यांची आहे.

करीता मंजुरीप्रमाणे चिकलठाणा आठवडी बाजारासाठी प्राप्त सर्वात जास्त दराची निविदा श्रीमती सुमित्रा संजय चव्हाण यांची र.रू.16,151/- प्रती बाजार दराने मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

मा.सभापती : सदरील आठवडी बाजार वसुलीच्या ठेक्याची मुदत ही एक वर्षासाठी राहील, यासह प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा आठवडी बाजार वसुलीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराची निविदा श्रीमती सुमित्रा संजय चव्हाण यांची र.रू.16,151/- प्रती बाजार या दराप्रमाणे संबंधीतास आठवडी बाजाराच्या वसुलीचा ठेका एक वर्षासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 62 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,....

विषय :- महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडीयम येथील खेळाच्या मैदानालगत RCC water tank, pump house व Gutter बांधणे बाबत या कामाचे ठेकेदार श्री.एम.ए.सिद्यीकी यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 14.14% कमी दराने म्हणजेच र.रु.32,52,986.58 पर्यंत करुन घेणेस. व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर Tender Id. 216_AMCA_135273_1

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता(जलनि:सारण विभाग) |
| 2. | कामाचे स्वरुप | आर.सी.सी. गटार बांधणे, पंप हाऊस बांधणे, व गटार बांधणे |
| 3. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे. मा.सर्वसाधारण सभा विषय क्र 441 दिनांक 10.5.2016. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले. | 3788712/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.लोकपत्र,दै.प्रसार, दै.मुफ्फसीर (उर्दू) दिनांक 23.6.2016. |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 23.6.2016 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 8.7.2016 |
| 6 | एकुण किती टेंडर्स आली ? | 5 (पाच) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील प्रमाणे)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1) | महमंद अहेमद सिद्यीकी | 32,52,986.58 | 14.14% कमी दराने |
| 2) | एल.के.कन्स्ट्रक्शन | 3561425.48 | 5.999% कमी दराने |
| 3) | ओम सानप | 3589424.05 | 5.26% कमी दराने |
| 4) | सिद्यीकी कन्स्ट्रक्शन | 3324593.21 | 12.25% कमी दराने |
| 5) | नाझ डेव्हलपर्स | 3405671.60 | 10.11% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय ? | नाही |
| | असल्यास कारणे नमूद करावीत | नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे | क्रीडा संकुल 50% व महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोईसुविधांचा विकास करणे मधून 50% |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे काय ? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमूना जोडला आहे? | नाही |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.महमंद अहेमद सिद्यीकी यांचेकडून 14.14% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रु.32,52,986.58 पर्यंत करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती :विषय क्रमांक 62 ते 67 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडीयम येथील खेळाच्या मैदानालगत RCC water tank, pump house व Gutter बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.महमंद अहेमद सिद्यीकी यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.14% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.32,52,986.58 पर्यंत करुन घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 63 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,....

विषय :- महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडीयम येथील खेळाच्या मैदानाचे नूतनीकरण करणे बाबत या कामाचे ठेकेदार श्री.अर्चना सर्व्हीसेस यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 20.90% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.1,05,00,000/-पर्यंत करुन घेणेस. व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर Tender Id. 2016_AMCA_143148_4

**महाशय,**

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता(जलनिःसारण विभाग) |
| 2. | कामाचे स्वरुप | मनपा गरवारे स्टेडीयम खेळाच्या मैदानाचे नूतनीकरण करणे. |
| 3. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेच? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे. मा.सर्वसाधारण सभा विषय क्र 441 दिनांक 10.5.2016. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले. | 13274132/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.विश्वमित्र, दै.औरंगाबाद टाईम्स ऊर्दू, दै.भास्कर दि.23.6.2016 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 13 सप्टेबर 2016 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 15 सप्टेबर 2016 |
| 6 | एकुण किती टेंडर्स आली ? | 04 (चार) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील प्रमाणे)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1) | अर्चना सर्व्हीसेस | 12477687.57 | 6 % कमी दराने |
| | दराबाबत वाटाघाटी अंती ------ | 10500000.00 | 20.90% कमी दराने |
| 2) | रिलायबल एजन्सी | 13539618.43 | 2% जास्त दराने |
| 3) | साई गणेश एंटरप्रायजेस | 14336066.57 | 8% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय ? | नाही |
| | असल्यास कारणे नमूद करावीत | नाही |

| | | |
|---|---|---|
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे | क्रीडा संकुल 50% व महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोईसुविधांचा विकास करणे मधून 50% |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे काय ? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमूना जोडला आहे? | नाही |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार अर्चना सर्व्हीसेस यांचेकडून 20.90% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रु.10500000.00 पर्यंत करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडीयम येथील खेळाच्या मैदानाचे नूतनीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.अर्चना सर्व्हीसेस यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.90% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.1,05,00,000/-पर्यंत करुन घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 64 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,.....

विषय : वॉर्ड क्र.78, येथील रिलायन्स मॉल ते हिंदु राष्ट्र चौक पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करणे, या कामाचे ठेकेदार मस्कट कन्स्ट्रक्शन यांचेकडून 19.11% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.11555429/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र. सन 2016

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 01. | खात्याचे नांव | उप अभियंता झोन क्र.07 |
| 02. | कामाचे स्वरूप | रस्त्याचे मजबुतीकरण |
| 03. | पुर्व गणन पत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रू.12192344/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.11555429/- |
| 04. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती, त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर<br>15 जुलै 2016 |
| 05. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | 15/07/16 ते 28/07/16 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | 30/07/2016 |
| 06. | एकुण किती टेंडर आली? | चार |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रूपये | पुर्व गणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 01. | सहारा कन्स्ट्रक्शन | 11555429/- | 9.01 % कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| 02. | ए.एस.कन्स्ट्रक्शन | 11555429/- | 15.31% कमी दराने |
| 03. | पदमावती कन्स्ट्रक्शन | 11555429/- | 5.11% कमी दराने |
| 04. | मस्कट कन्स्ट्रक्शन | 11555429/- | 19.11% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 07. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलीत बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| 08. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थ शिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग-2016-17 |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 09. | सदरचे काम डिपॉझीट मधुन करण्यात येणार आहे काय? | मनपा फंडातून |
| | अ) असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझीट रजिष्टर पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पुर्व गणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे. | होय |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मस्कट कन्स्ट्रक्शन यांचेकडून 19.11% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.11555429/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फक्त अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.78, येथील रिलायन्स मॉल ते हिंदु राष्ट्र चौक पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मस्कट कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.11% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.11555429/- पर्यंत करून घेणेस, अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 65 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,.....

विषय : वॉर्ड क्र.78, शितल हॉटेल ते हायकोर्ट भिंती पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करणे व व्हॉईट टॉपींग करणे, या कामाचे ठेकेदार मस्कट कन्स्ट्रक्शन यांचेकडून 18.3% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.6622376/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र. सन

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 01. | खात्याचे नांव | उप अभियंता झोन क्र.07 |
| 02. | कामाचे स्वरूप | रस्त्याचे मजबुतीकरण व व्हॉईट टॉपींग करणे. |

| | | |
|---|---|---|
| 03. | पुर्व गणन पत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रू.70,12,143/- मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.482 दि.11/07/2016 |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.66,22,376/- |
| 04. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती, त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर<br>15 जुलै 2016 |
| 05. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | 15/07/16 ते 28/07/16 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | 30/07/2016 |
| 06. | एकुण किती टेंडर आली? | चार |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रूपये | पुर्व गणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 01. | मस्कट कन्स्ट्रक्शन कं. | 6622376/- | 18.03 % कमी दराने |
| 02. | पदमावती कन्स्ट्रक्शन | 6622376/- | 7.86 % कमी दराने |
| 03. | सहारा कन्स्ट्रक्शन | 6622376/- | 8.01 % कमी दराने |
| 04. | मे. ए.एस. कन्स्ट्रक्शन | 6622376/- | 12.12% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 07. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलीत बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| 08. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थ शिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 09. | सदरचे काम डिपॉझीट मधुन करण्यात येणार आहे काय? | मनपा फंडातून |
| | अ) असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझीट रजिष्टर पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पुर्व गणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे. | होय |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मस्कट कन्स्ट्रक्शन यांचेकडून 18.3% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.6622376/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फक्त अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.78, शितल हॉटेल ते हायकोर्ट भिंती पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करणे व व्हॉईट टॉपींग करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मस्कट कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.3% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.6622376/- पर्यंत करून घेणेस, अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 66 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,.....

विषय : वॉर्ड क्र.83, अंतर्गत NS सेक्टर एन-4 येथील रस्त्याचे काँक्रीट करणे, या कामाचे ठेकेदार एफ.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून 3.49% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.2593871/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र. 52-14-307 सन 2015

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 01. | खात्याचे नांव | उप अभियंता झोन क्र.07 |
| 02. | कामाचे स्वरूप | रस्त्याचे काँक्रीटींग करणे. |
| 03. | पुर्व गणन पत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रू.27,23,565/- मा.स्था.स.सभा ठराव क्र.76 दि.03/09/2014 |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.25,93,871/- |
| 04. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती, त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | मनपा-ई-टेंडर 12/01/2015 |
| 05. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | 30/01/2015 |
| 06. | एकुण किती टेंडर आली? | दोन |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रूपये | पुर्व गणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 01. | एफ. के. कन्स्ट्रक्शन | 2593871/- | 3.49 % कमी दराने |
| 02. | शेख मो. ईब्राहीम | 2697625/- | 4 % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 07. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलीत बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| 08. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थ शिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | वार्ड-ई अंतर्गत विविध विकास कामे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 09. | सदरचे काम डिपॉझीट मधुन करण्यात येणार आहे काय? | मनपा फंडातून |
| | अ) असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझीट रजिष्टर पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पुर्व गणक पत्राच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे. | होय |

तरी विषयांकित काम ठेकेदार एफ.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून 3.49% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.25,03344/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फक्त अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.83, अंतर्गत NS सेक्टर एन-4 येथील रस्त्याचे काँक्रीट करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक एफ.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून 3.49% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.25,03344/- पर्यंत करून घेणेस

अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 67 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,.....

विषय : 60 अ.श. क्षमतेच्या ट्रॅक्टरवर लोडर व लेव्हलर ॲटॅचमेंटसची उभारणी करून पुरवठा करणे (02 नग) या कामासाठी ठेकेदार इंटरनॅशनल ट्रॅक्टर लि. (सोनालिका इंटरनॅशनल) चे अधिकृत विक्रेते मे.महालक्ष्मी ॲग्रो एजन्सीज कन्नड यांचेकडून प्रति नग रूपये 14,99,000/- दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 29,98,000/- (रूपये एकोणतीस लक्ष अठ्ठ्याण्णव हजार फक्त) प्रमाणे 60 अ.श. ट्रॅक्टरवर लोडर व लेव्हलरची ॲटेचमेंसची उभारणीसह खरेदी करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र. 08-16-90- अ सन 2015

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 01. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (1,2,3 व 8) |
| 02. | कामाचे स्वरूप | 60 अ.श. क्षमतेच्या ट्रॅक्टरवर लोडर व लेव्हलर ॲटॅचमेंटसची उभारणी करून पुरवठा करणे (02 नग) |
| 03. | पुर्व गणन पत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, सर्वसाधारण सभा ठराव क्र.286 दि.07/01/2016 रक्कम रूपये 309 लक्ष |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.30,19,590/- |
| 04. | ज्या वृत्तपत्र/ वेबसाईटवर टेंडर्सची जाहिरात देण्यात आली त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | (www.ametenders.com) 30/05/2016 |
| 05. | अ) टेंडर स्विकारण्याची मुदत | दिनांक 30/05/2016 ते दि.06/06/2016 |
| | ब) टेंडर उघडल्याचा दिनांक | दि.22/09/2016 |
| 06. | एकुण किती टेंडर आली? | एकुण 01 टेंडर्स (चौथी वेळ) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रूपये | पुर्व गणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रूपये | टक्केवारी |
| 01. | मे.महालक्ष्मी ॲग्रो एजन्सीज, कन्नड | 29,98,000/- | रू.21590/- कमी | 00.72% कमी |
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| 07. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलीत बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| 08. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थ शिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शहर एकात्मीक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत (कोड क्र.2144133007) |

| | | |
|---|---|---|
| | | सन 2016-17 अर्थसंकल्पीय तरतुद (ई-61) रू.270 लक्ष |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 09. | सदरचे काम डिपॉझीट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझीट रजिष्टर पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पुर्व गणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे. | होय |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.महालक्ष्मी अॅग्रो एजन्सीज, कन्नड यांचेकडून निविदा र.रूपये 30,19,590/- पेक्षा रूपये 21590/- कमी म्हणजेच रक्कम रूपये 29,98,000/- मध्ये करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 60 अ.श. क्षमतेच्या ट्रॅक्टरवर लोडर व लेव्हलर अॅटॅचमेंटसची उभारणी करून पुरवठा करणे (02 नग) या कामासाठी प्राप्त झालेल्या इंटरनॅशनल ट्रॅक्टर लि. (सोनालिका इंटरनॅशनल) चे अधिकृत विक्रेते मे.महालक्ष्मी अॅग्रो एजन्सीज,कन्नड यांचेकडून प्रति नग रूपये 14,99,000/- दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 29,98,000/- (रूपये एकोणतीस लक्ष अठ्ठ्याण्णव हजार फक्त) प्रमाणे 60 अ.श. ट्रॅक्टरवर लोडर व लेव्हलरची अॅटेचमेंसची उभारणीसह खरेदी करण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 68 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध मुख्य रस्त्यांची सुधारणा करण्याचे कामाचे विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे करीता निविदा पूर्व व निविदा नंतरची कामे करणे करीता PMC यांची नियुक्ती करणे.

या कामाचे ठेकेदार, जगप्रयाग इन्फ्रा प्रा. लि. यांचेकडून प्रकल्प अहवाल किमतीच्या 1.20% (सर्व्हीस टॅक्ससह) दराने म्हणजेच प्रकल्प किंमत र.रु.150.00 कोटी पर्यंत करुन घेणेच्या 1.20% रक्कम रू.1.80 कोटी + लागू सर्व करासह करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत..

संदर्भ:- टेंडर क्र. EOI Name No: AMC /IRDP/420/2016 दि. 29/06/2016 सन ID- 2016 ANCA-137081-2

महाशय,

| 1. | **खात्याचे नांव** | **कार्यकारी अभियंता (4,5,6,7,9)** |
|---|---|---|
| 2. | कामाचे स्वरुप | रू. 150.00 कोटी प्रकल्प किमती करीता शहरातील विविध रस्त्याची सुधारणा करणे बाबत डी. पी. आर. बनविणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मान्य झाले आहे. मा. सर्वसाधारण सभा दि. 10/05/2016 (का.प.क्र.20) विषय क्र. 433 नूसार ठराव. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | डी. पी. आर. तयार करण्यासाठी पी. एम. सी. नियुक्ती करीता टेंडर मागविण्यात आले. |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई- टेंडरद्वारे प्रसिध्दी दि. 29/06/2016 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | पहिली वेळ दि. 15/07/2016 दु. 2.00 वाजेपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | | दुसरी वेळ :- 5/8/2016 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | पहिली वेळ दि. 15/07/2016<br>दुसरी वेळ :- दि. 8/8/2016 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एकूण 03 टेंडर्स प्राप्त झाले. |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्ाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1) | जगप्रयाग इन्फ्रा प्रा. लि., शॉप नं. 03 मलंर्ग बिजनेस सेंटर, अंबेजोगाई रोड , लातूर 431512 | रू. 150.00 कोटी रक्कमेचा DPR किमंत | DPR किमतीच्या 1.90% (सर्व करांसहीत) ( वाटाघाटी अंती 1.20% निश्चीत केले. |
| 2) | सी. व्ही कंद कन्सलटंट प्रा. लि. 201/202, साई एम्पायर, तिसरा मजला | रू. 150.00 कोटी रक्कमेचा DPR किमंत | DPR किमतीच्या 2.65 % (सर्व करांसहीत) |
| 3) | दि निसर्ग कन्सलटन्सी , D-15 , दुसरा मजला, सेठीज सिटी प्लाझा, गडकरी चौक कालिका मंदिरासमोर जुना आग्रा रस्ता, नाशिक 422001 | रू. 150.00 कोटी रक्कमेचा DPR किमंत | DPR किमतीच्या 2.88 % (सर्व करांसहीत) |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. वाटाघाटी करीता शिफारस करण्यात आली व वाटाघाटी अंती DPR किमतीच्या 0.50% निविदा पूर्व व 0.70 % निविदा नंतरच्या कामाकरीता याप्रमाणे 1.20% (सर्व करांसहीत) दरनिश्चीत करण्यात आले. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | निरंक |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निरंक |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | लेखाशिर्ष pmc चार्जेस रू. 3.75 कोटी सन 2016-2017 पृष्ट क्र. E-52 प्रमाणे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | निरंक |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | निरंक |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे? | निरंक |
| | तरी विषयांकीत काम ठेकेदार जगप्रयाग इन्फ्रा प्रा. लि.,यांचेकडून. प्रत्यक्ष प्रकल्प किंमतीच्या 0.50 % निविदा पूर्व + 0.70 % निविदा नंतर याप्रमाणे एकूण 1.20 % (सर्व करासह) वाटाघाटी दराने टेंडर / EOI अटी/शर्तीनूसार करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती :विषय क्रमांक 68.

श्री.राजगौरव वानखेडे :150 कोटी रूपये प्रकल्प किंमती करीता डी.पी.आर बनविणे करीता देणार आहोत. विभाग प्रमुख यांनी कामा बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्री.सिकंदर) :विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे करीता निविदा पूर्व व निविदा नंरतची कामे करणे करीता पीएमसीची नियुक्ती करण्यात येणार आहे. अंदाजपत्रक तयार करून डिपीआर तयार करायचा आहे. एजन्सी फिक्स झाल्यानंतर सुपरव्हिजनचे कामही त्यांनी करायचे आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :पीएमसीला 01 कोटी 80 लाख रूपये यापोटी देणार आहोत. हे संयुक्तिक नाही. यापुर्वीच्या पीएमसीच्या कामांचा महानगरपालिकेचा अनुभव वाईट आहे. उदा.भुमीगत, समांतर, रस्त्यांच्या कामाबाबत, बीओटीच्या कामांबाबतचा अनुभव चांगला नाही. डिपीआर तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खाते, सिडको किंवा निवृत्त अभियंते यांना मानधनावर हे काम देण्यात यावे. सातारा देवळाई संदर्भाने सिडको प्लॅनिंग करून देणार आहे. सिडकोचे प्रशासक श्री.सुनिल केंद्रेकर यांना विनंती करण्यात यावी. सिडकोचे अभियंता मार्फत कमी खर्चामध्ये हे काम करण्यात येईल. या प्रस्तावास आमचा विरोध आहे.

श्री.कैलास गायकवाड :यामध्ये शासन निर्णय काढण्यात आलेला आहे का? कशाच्या आधारे डिपीआर तयार करण्यात येत आहे तसेच सदर एजन्सीने कुठे काम केलेले आहे, कामाचा अनुभव आहे का ? याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :शासनाचे याबाबतीतील काही गाईडलाईन आलेली आहे का?

श्री.विकास एडके :पीएमसी नेमल्यानंतर हे 150 कोटी रूपये मिळण्याची हमी आहे का?

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता :अशा प्रकारचे कामे एजन्सीने केलेले आहे. महानगरपालिकेकडे मनुष्यबळ कमी असल्याकारणाने पीएमसीकडुन डिपीआर तयार करण्याचे काम करण्यात येणार आहे व शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मनुष्यबळ नसल्याने एजन्सीकडून काम करून घेण्यात येत आहे हा मेन मुद्दा आहे का?

कार्यकारी अभियंता :मनपाकडे मनुष्यबळा अभावी सदरचे कामासाठी पीएमसी नेमण्यात येत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :शासनाचे पीएमसी नेमण्याचे काही गाईडलाईन आहे का?

कार्यकारी अभियंता :पीएमसी नेमण्याचे शासनाचे असे काही बंधन नाही.

श्री.कैलास गायकवाड :पीएमसी नेमणुकीसाठी 1 कोटी 80 लाख रूपये खर्च करणार आहे. आज महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती बरोबर नाही. सातारा देवळाईचा विकास योजनेचे काम सिडको करून देणार आहे. त्यामुळे श्री.केंद्रेकर व मा.आयुक्त यांना पत्र देवुन विनंती करण्यात यावी की, सिडकोकडुन डिपीआर तयार करून घेण्यात यावा. महानगरपालिकेचे 1 कोटी 80 लाखाची बचत होईल. या प्रस्तावास विरोध आहे. प्रस्ताव नामंजूर करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :निवृत्त अभियंता यांचेकडून सदरचे काम करून घेण्यात यावे, किंवा सिडको,बि एण्ड सी कडुन हे काम करून घेण्यात यावे. अशी विनंती

संबधीत विभागास करण्यात यावी तसेच देखरेखीचे काम त्यांचेकडे सोपविण्यात यावे. हा प्रस्ताव फेटाळण्यात यावा.

मा.सभापती :असे अधिकारी आपल्याकडे आहे का?

श्री.कैलास गायकवाड :मा.आयुक्त यांना पत्र देण्यात यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :ही जबाबदारी प्रशासनाची आहे त्यांचेवर ही जबाबदारी सोपविण्यात यावे.

श्रीमती शेख शमीना, श्रीमती संगीता वाघुले :सदर प्रस्तावास एमआयएमचा व आमचा विरोध आहे.

श्री.विकास एडके :महानगरपालिकेत आजपर्यंत जी ही पीएमसींची नेमणुक केलेली आहे. ते सगळयाच स्तरावर Failuar झालेले आहेत. पीएमसी नेमण्यात येऊ नये महानगरपालिकेचे 1 कोटी 80 लाख रूपयांची बचत होणार आहे. त्यामुळे सेवानिवृत्त अधिकारी, सिडको, बी एण्ड सी कडुन हे काम करून घेण्यात यावे. मानधनावर हे काम करून घेण्यात यावे. साधारणतः 25 लाख रूपये खर्च येईल. सदर प्रस्तावास विरोध आहे.

मा.सभापती :सिडको आणि बी एण्ड सी विभागांकडून किती दिवसामध्ये डीपीआर तयार करून मिळेल.

कार्यकारी अभियंता :पीएमसीची नेमणुक केल्यावर पीएमसीची जबाबदारी राहील त्यांच्यावर बंधनकारक राहील. इतरांकडुन काम करून घेण्याकरीता अकाँऊटॅबीलिटी (विश्वासअर्हता) नसते. विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे करीता निविदा पूर्व व निविदा नंरतची सर्व कामे पीएमसीला करायचे आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :एकाही पीएमसीने एकाही प्रोजेक्टमध्ये जबाबदारीने काम केलेले नाही. श्री.सुनिल केंद्रेंकर, सिडकोचे प्रशासक यांना विनंती केल्यावर डिपीआर तयार करून मिळेल. पीएमसी नियुक्त करण्याची आवश्यकता नाही.

श्री.राजसाहेब आमले :पीएमसी नियुक्त करण्याबाबत शासनाचा असा कुठलाही नियम नाही. शासकीय सेवा निवृत्त अधिकारी हे काम करू शकतील. सर्व सदस्यांच्या वतीने हा प्रस्ताव रद्य करण्यात यावा.

श्रीमती किर्ती शिंदे :स.सदस्यांशी सहमत आहे. मा.आयुक्त यांना श्री.केंद्रेंकर यांना विनंती करण्यात यावी.

मा.सभापती :मानधनावर सिडको महानगरपालिकेला किती दिवसांमध्ये हे काम करून देण्यात येईल. लवकरात लवकर हे काम करता येईल का?

कार्यकारी अभियंता :सिडको, बी & सी, यांना विनंती करावी लागेल ते तयार झाल्यानंतर हे काम करावे लागेल. ते तयार न झाल्यास महानगरपालिकेच्या यंत्रणे मार्फत हे काम करावे लागेल. किंवा पीएमसी नेमणुक करून काम करावे लागेल.

श्री.राजगौरव वानखेडे :सिडकोशी चर्चा करण्यात यावी तो पर्यंत सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा. स्थायी समितीने प्रस्ताव रद्य केल्यामुळे 150 कोटी परत गेले असे न होता, डिपीआर संदर्भाने सिडको व इतर कार्यालयाशी चर्चा करण्यात यावी.

श्री.विकास एडके :सदर टेंडर हया एकमेव एजन्सीला का द्यायचे.

श्री.कैलास गायकवाड :150 कोटी देण्याच्या संदर्भात शासनाने शासन निर्णय काढलेला आहे का? हा महत्वाचा विषय आहे. ॲथेंन्टींक शासन निर्णय नसेल तर 75 लाख रूपये एजन्सीला कशासाठी द्यायचे.

श्री.राजगौरव वानखेडे :डिपीआर तयार करून शासनाकडे पाठविला जर शासनाने प्रस्ताव फेटाळला तरीही पीएमसीला ठराव झाल्याबरोबर 75 लाख रूपये द्यायचे आहे.

श्री.कैलास गायकवाड :शासनाने डिपीआर नामंजूर केल्यास महानगरपालिकेचे 75 लाख रूपये वाया जाणार. सदरचा प्रस्ताव रद्द करावा.

कार्यकारी अभियंता :काम केल्यावरच पेमेंट अदा केल्या जाईल.

मा.सभापती : प्रस्ताव क्रमांक 68 च्या संदर्भात सर्वच सदस्यांचे म्हणने आहे की, 75 लाख रूपये प्रस्ताव मान्य केल्यावर द्यावे लागेल. सिडको, बी ॲण्ड सी कडुन हे काम करून घेण्यात यावे, तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगीत करण्यात येतो. सर्व स.सदस्यांच्या म्हणण्यानुसार सिडको आणि बी ॲण्ड सी कडुन तातडीने डिपीआर तयार करण्याचे काम करण्यात यावे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्तावा संदर्भात सर्वच सदस्यांचे म्हणण्याप्रमाणे 75 लाख रूपये प्रस्ताव मान्य केल्यावर द्यावे लागेल, म्हणुन सिडको, बी ॲण्ड सी कडुन हे काम करून घेण्यात यावे, तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगीत करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 69 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक 30/09/2016 रोजी दिलेल्या मंजुरीनुसार श्री.अशोक विठ्ठलराव बोर्डे, स.मजुर प्रभाग क्रमांक 09, यांच्या मुलाच्या किडनीच्या वैद्यकीय उपचाराकरीता खर्च केलेल्या एकुण रूपये 7,04,001/- च्या वजा अनुज्ञेय नसलेली अनुज्ञेय रक्कम 1,21,518/- च्या वजा जाता शिल्लक रक्कम 5,82,483/- च्या 90 % म्हणजेच 5,24,235/- रूपये वैद्यकीय खर्चाचे परतावा म्हणुन मंजूर करण्यात येतो. प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. संबंधीताने धनादेश क्रमांक 286072 दि.11/01/2016 रक्कम रूपये 1,50,000/- अग्रीम घेतलेली असून मंजुर रक्कम रूपये 5,24,235/- च्या 5% रक्कम म्हणजेच रूपये 35,200/- मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.4,89,035/- मधुन अग्रीम घेतलेली रक्कम रूपये 1,50,000/- वजा जाता 3,39,035/- वैद्यकीय खर्चाचा परतावा संबंधीतास अदा करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अशोक विठ्ठलराव बोर्डे, स.मजुर प्रभाग क्रमांक 09, यांच्या मुलाच्या किडनीच्या वैद्यकीय उपचाराकरीता खर्च केलेल्या एकुण रूपये 7,04,001/- च्या वजा अनुज्ञेय नसलेली अनुज्ञेय रक्कम 1,21,518/- च्या वजा जाता शिल्लक रक्कम 5,82,483/- च्या 90 % रक्कम रूपये 5,24,235/- च्या 5% रक्कम म्हणजेच रूपये 35,200/- मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.4,89,035/- मधुन अग्रीम घेतलेली रक्कम रूपये 1,50,000/- वजा जाता 3,39,035/- वैद्यकीय खर्चाचा परतावा संबंधीतास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.मुकूंद कुलकर्णी :योगेश गुंजार नामक व्यक्तीचे रात्री 12 वाजता बजरंग चौक, चिस्तिया कॉलनी येथील रस्त्यामधील स्पिडब्रेकर मोठे केले असल्यामुळे त्यांचा अंदाज न आल्याने दुचाकी स्पिडब्रेकरवर धडकुन त्यांचा मृत्यु झालेला आहे.संबधीत कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्यात यावे. उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार स्पिडब्रेकरचे काम झालेले नाही. अनेक दुचाकी त्यावर धडकुन जखमी होत आहे या बाबत मी संबधीतांना सूचना केली होती.

| | |
|---|---|
| वार्ड अभियंता | :स्पिडब्रेकर हे जुने आहे. |
| श्री.मुकूंद कुलकर्णी | :जुने स्पिब्रेकरची उंची वाढविण्यात आलेली आहे त्यामुळे अपघात झालेला आहे. |
| वार्ड अभियंता | :याबाबत प्रत्यक्ष पहाणी केली जाईल |
| श्री.मुकूंद कुलकर्णी | : सदरील रस्त्यांवर अनेक खड्डे पडलेले होते त्या वेळेस असे अपघात झालेले नाही. उंची वाढविल्यामुळे दुचाकी त्या ठिकाणी धडकुन अपघात होत आहे. |
| कार्यकारी अभियंता | :याबाबत प्रत्यक्ष पहाणी केली जाईल. नियमानुसार ते स्पिडब्रेकर काढण्यात येईल. |
| श्री.मुकूंद कुलकर्णी | :संबधीत कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्यात यावा. |
| मा.सभापती | :यासंबधी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात येईल. संबधीत अधिकारी, कंत्राटदार यांच्या चुकीमुळे झाले असेल तर संबधीता विरूध्द गुन्हे दाखल करावे लागेल. यासंबधी चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :मालमत्ता सर्वेक्षणा संदर्भात माहिती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :करमुल्य निर्धारक व संकलक यांनी मला माहिती दिली आहे. वसुलीची मोहिम जोरदार चालू असल्यामुळे ते प्रत्यक्ष स्थळ पहाणीवर आहेत. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :तीन वेळा रिकॉल करूनही प्रतीसाद आलेला नाही. यासंबधी माहिती देण्यात यावी. लेखा विभागातुन साप्ताहिक अहवाल देण्यात आलेला आहे का? |
| मा.सभापती | :चार साप्ताहिक अहवाल देण्यात आलेला आहे. |

याच बरोबर मा.सभापती यांनी सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(अपर्णा थेटे)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद